# ‘भीमा’ प्रकरणी मुन्ना महाडिकांशी पंगा घेण्याची वेळ आली तरी बेहत्तर; अजित पवार राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील रोखठोकच बोलले!



✔ सोलापूर/प्रतिनिधी

मोहोळ तालुक्यातील टाकळी सिंकदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्याच्या खासगीकरणाचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. दरम्यान मोहोळ, पंढरपूर आणि मंगळवेढा या तीन तालुक्यातील तब्बल २२ हजार कुटुंब आणि लाखभर शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयात शेतकरी सभासद आणि कारखान्याचे कामगार यांना सोबत घेऊन न्यायालयीन लढ्यासोबतच रस्त्यावरची आक्रमक लढाई लढण्यासाठी सज्ज होत आहोत, असं अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी आज बुधवार (ता.२५) दैनिक ‘सुराज्य’ कार्यालयाच्या सदिच्छा भेटीदरम्यान सांगितले.

विशेषत्वे, भीमा कारखान्याचे खासगीकरण रोखल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, हे स्पष्ट करताना भाजपचे खासदार मुन्ना ऊर्फ धनंजय महाडिक यांच्याशी पंगा घेण्याची वेळ आली तरी शेतकऱ्यांची हितासाठी ते बेहत्तर. याप्रकरणात वाटेल त्या संघर्षाची तयारी आपण करीत आहोत, हे नमूद करताना शेतकरी सभासदांना सोबत घेऊन न्यायालयीन लढाईबरोबरच आता रस्त्यावरची लढाईदेखील लढणार असं त्यांनी यावेळी ठासून सांगितले.

● कारखान्याचे खासगीकरण रोखण्यासाठी वाटेल त्या संघर्षाची तयारी
● शेतकरी सभासदांना सोबत घेऊन न्यायालयीन लढाईबरोबरच आता रस्त्यावरची लढाईदेखील लढणार

## उमेश पाटील पत्रकार परिषदेत काय म्हणाले?

- अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसची जिल्ह्याची बॉडी पंधरा दिवसात जाहीर करणार
- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा जुलै महिन्यात दोन दिवसांचा सोलापूर दौरा ठेवण्याचा प्रयत्न
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीच्या झेंड्याखालील लढण्याचा होईल निर्णय
- पक्षनिष्ठा असली तरी निवडून येण्याच्या निकषावरच अजित पवार राष्ट्रवादी पक्षाची उमेदवारी देण्यासंबंधी होणार विचार
- निवडणुकीसाठी उमेदवारी न मिळालेल्यांना पक्ष पातळीवर काम करण्याची विविध पदांवर देणार संधी
- ‘डीसीसी’बँकेवर प्रशासकीय कारभार राहण्यासाठी उपमुख्यमंत्री पवार आणि सहकार मंत्र्यांकडे करणार पाठपुरावा
- सोलापूर जिल्ह्यात आमदार नसले तरी राष्ट्रवादीचा मतदार आणि कार्यकर्ता संपलेला नाही
- मोहोळचं नेतृत्व आता बेदखल झाल्याचे अशा नेतृत्वाची दखल घेण्याची नाही गरज
- शक्तीपीठ मार्गासारखे प्रकल्प उभारणे गरजेचे, या प्रकल्पाला पक्षासह आपला वैयक्तीक असणार पाठिंबा
- संघटन आणि नेतृत्वाचा मोठा अनुभव, सोलापूर जिल्ह्यात अजित पवार राष्ट्रवादी पक्ष दिसेल टॉपवर
- शरद पवार राष्ट्रवादी गटाचे जिल्ह्यातील चार आमदार अजित पवार राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे गटासोबतच
- जिल्ह्यातील ऊसासंबंधी प्रश्न हाताळणार, शेतकऱ्यांच्या नावे परस्पर कर्ज उचलण्याच्या प्रकरणात घालणार लक्ष

## खासगीकरणावेळी अनेक बाबी बेकायदेशीर, ८०० कोटींचे कर्ज असताना ‘मल्टिस्टेट’ची प्रक्रिया झाली कशी?



संग्रहित छायाचित्र

साखर कारखान्यासारख्या कोणत्याही सहकारी संस्थेचे खासगीकरण करताना त्या संबंधित संस्थेवर कर्ज नसायला हवे, असा निकष आहे. कर्ज असेल तर खासगीकरणाची प्रक्रिया होत नाही. भीमा कारखान्यावर महाराष्ट्र बँकेच्या २५० कोटींसह अन्य वित्तीय संस्थांची अंदाजे ८०० कोटींची कर्जे आहेत, अशी परिस्थितीत या कारखान्याची खासगीकरणाची प्रक्रिया झालीच कशी? हा मुद्दा महत्त्वाचा आहे. या कारखान्याच्या खासगीकरणावेळी मुख्यत्वे, कर्जासह सर्वसाधारण सभा, सभासदांसह संचालकांची मान्यता आदी बाबी खोट्या दाखविल्यासंबंधी आक्षेप आहेत, ते बघण्यात येतील, खोट्या बाबींच्या आधारे कारखाना खासगीकरणाची प्रक्रिया झालीच कशी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## उमेश पाटलांचे सोलापुरातही जंगी स्वागत




अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याध्यक्ष उमेश पाटील यांचे बुधवारी सोलापुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात पक्षाच्यावतीने जंगी स्वागत करण्यात आले. उमेश पाटील चाहत्यांची त्यांचे मनस्वी स्वागत करीत अभिनंदन केले. मोहोळ शहराप्रमाणेच सोलापुरातही त्यांचे जंगी स्वागत झाले.

## उमेश पाटील नैतिकता पाळणारं नेतृत्व; भूमिका बदलल्यास शेतकरी सभासद काय म्हणतील?

भीमा कारखान्यावर माजी आमदार राजन पाटील गटाची सत्ता येऊ नये, म्हणून या कारखान्याच्या सर्वपक्षीय आघाडीसोबत मी राहिलो, त्यावेळी शेतकऱ्यांना मते मागितली. शेतकरी सभासदांनी विश्वास ठेऊन कारखान्याची सत्ता ताब्यात दिली. दरम्यान जेव्हा कारखाना अडचणीत आला, त्याच्या खासगीकरणाचा घाट घातला जाऊ लागला, कारखान्यावरची शेतकऱ्यांची हुकमत चालली त्यावेळी माझ्याकडे येणाऱ्या शेतकऱ्याला मी काय उत्तर देणार? नैतिकता पाळणारं माझं नेतृत्व आहे. मी कारखान्याबद्दल भूमिका बदलणार नाही. खासगीकरण थांबलं पाहिजे, या शेतकऱ्यांच्या भावनांसोबत आपण कायम राहणार आहे.

## ‘भीमा’ शेतकऱ्यांच्या मालकीचाच राहण्यासाठी बचाव समितीमार्फत संघर्षाचा देणार लढा

मोहोळ, पंढरपूर आणि मंगळवेढा या तीन तालुक्यातील शेतकरी सभासदांची मालकी या कारखान्यावर आहे. मोहोळ तालुक्यातील हा एकमेव सहकारी कारखाना आहे. शेतकरी सभासदांनी महाडिक परिवारास कारखान्याचा कारभार करण्यासाठी बसविले, कारखान्याची स्वत:ची मालकी करुन घेण्यासाठी नाही. या काखान्यावर शेतकऱ्यांचीच मालकी राहायला हवी ही आपली भूमिका आहे, त्यासाठी आपण आग्रही राहून भीमा कारखाना बचाव संघर्ष समितीच्यावतीने संघर्षाचा लढा देणार आहोत.



सोलापूर : अजित पवार राष्ट्रवादीचे नूतन सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी दै. सुराज्य कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी संपादक राकेश टोळ्ये यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी सरव्यवस्थापक पुरुषोत्तम मित्रगोत्री, वृत्तसंपादक शिवाजी भोसले आदी उपस्थित होते.

# अखेर पार्क स्टेडियम ‘एमसीए’ला सोपविण्यावर शिक्कामोर्तब

### तिकीट विक्रीच्या नफ्यातील २० टक्के हिस्सा महापालिकेला मिळणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

इंदिरा गांधी स्टेडियम (पार्क) महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला ३० वर्षांच्या मुदतीवर चालविण्यास देण्यास महापालिकेच्या उपसमिती बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. वर्षाला एमसीए या स्टेडियमच्या देखभाल दुरुस्तीवर एक कोटींचा खर्च करणार आहे. तसेच महापालिकेला दरवर्षी एक लाख रुपये देणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेंतर्गत शहरात पार्क स्टेडियम, विकसित करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात या दुरुस्तीवर महापालिकेचा खर्च होत होता. हा खर्च मोठ्या प्रमाणात होत होता. यामध्ये महापालिकेला वर्षाला सुमारे ७० लाख रुपये तोटा सहन करावा लागत होता. दरम्यान, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने पार्क स्टेडियम चालविण्यास देण्याच्या मागणीचा प्रस्ताव महापालिकेला सादर केला होता. त्यावर बुधवारी महापालिकेच्या उपसमितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. वर्षाला एमसीए या स्टेडियमच्या देखभाल दुरुस्तीवर १ कोटींचा खर्च करणार आहे. तसेच महापालिकेला एमसीए दरवर्षी एक लाख रुपये देणार आहे. पार्क स्टेडियम आणि जिम्नेशियम हे दोन्हीही एमसीए चालविणार आहे. ३० वर्षासाठी हा करार करण्यात येत आहे. त्याचबरोबर पार्क स्टेडियमवर व्यवसायिक मॅचेस झाल्यानंतर त्याच्या तिकीट विक्रीच्या नफ्यातील २० टक्के हिस्सा एमसीए महापालिकेला देणार आहे. आवश्यक त्या सोयी सुविधाही एमसीए कडून पार्क स्टेडियमवर करण्यात येणार आहेत. नाईट मॅचेस सुरू करण्याचा एमसीएचा प्रयत्न राहणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन कडून पार्क स्टेडियमवर प्रादेशिक प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्यात येणार आहे. यामुळे इतर जिल्ह्यातूनही खेळाडू येथे येतील. त्याचबरोबर स्थानिक खेळाडूंनाही मोठी सोय होणार आहे, असेही महापालिका आयुक्तांनी सांगितले.




**महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची माहिती**

### ॲडव्हेंचर पार्क, वॉकिंग ट्रॅकसाठी मक्तेदार निश्चित

ॲडव्हेंचर पार्क, सिद्धेश्वर तलाव परिसरातील वॉकिंग ट्रॅक, बाबा गाडी याचाही मक्तेदार निश्चित करण्यात आला आहे. या ठिकाणी आवश्यक ती देखभाल दुरुस्ती आणि सोयी सुविधांचा खर्च मक्तेदाराकडून करण्यात येणार आहे. दरमहा ७५ हजार रुपये संबंधित मक्तेदार महापालिकेला देणार आहे. येत्या महिनाभरात ॲडव्हेंचर पार्क सुरू करण्यात येणार आहे. दिवाळीपर्यंत टप्प्याटप्प्याने हा संपूर्ण प्रकल्प लोकांसाठी उपलब्ध होणार आहे. हुतात्मा गार्डनचाही मक्तेदार निश्चित करण्यात आला असून या संपूर्ण परिसराची देखभाल दुरुस्तीचा खर्चही संबंधित मक्तेदार करणार आहे.

### नोडल अधिकारीपदी उपायुक्त लोकरे

सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजनेंतर्गत झालेल्या विविध विकास कामांच्या देखभाल दुरुस्तीसाठी नोडल अधिकारी म्हणून उपायुक्त आशिष लोकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातली आवश्यक ती सर्व जबाबदारी उपायुक्त लोकरे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे, असेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

